## प्रकरण तिसरे :

# अनंत कदम हयांच्या कादंबरीमधील अनुभवविश्व

| | | |
|---|---|---|
| ३.१. | प्रास्तविक | पृ.२९ ते पृ.३० |
| ३.२. | अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील अनुभवविश्व | पृ.३० ते पृ.३७ |
| ३.३. | अनंत कदम हयांच्या 'कॅन्सर' (१९८९) हया कादंबरीमधील अनुभवविश्व | पृ.३७ ते पृ.४२ |
| ३.४. | समारोप | पृ.४३ ते पृ.४४ |

## प्रकरण तिसरे :

# अनंत कदम हयांच्या कादंबरीमधील अनुभवविश्व

### ३.१. प्रस्ताविक :

प्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये 'मराठी कादंबरीची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी कादंबरीचे स्थान' हे आपण जाणून घेतले. प्रबंधिकेच्या हया तिसऱ्या प्रकरणामध्ये अनंत कदमाच्या कादंबऱ्यांमधील अनुभवविश्वाचा विचार करावयाचा आहे. त्यांची पहिली कादंबरी 'किडे' (१९७१) ही पहिल्या जाणिवेच्या अनुभवातून लिहिली गेली. भोवतालचे अमर्याद, सतत जवळ येणारे सलगीचे जग आणि आयुष्यातील साऱ्या लौकिकाला पाठ फिरवावी लागल्यामुळे अधिक तीव्रतेने येणारी निराशा, चीड, राग हयातून सुटका नाही, ही अनुभवाची पातळी 'किडे' हया कादंबरीत प्रगट झाली. बाहय जगतातील आकलनाला प्राधान्य देऊन त्यातील अनुभवांचे धागेदोरे स्वत:भोवती लपेटण्याचे त्यांनी नाकारले आहे. आयुष्य हे दाहक आहे, असत्य आहे, त्याची साक्ष आता अनेक कादंबरीकार पटवू लागले आहेत. अर्थात् काही आस्वादकाच्या भूमिकेतून, काही अवलोकनातून, तर काही अनुभवाच्या मुशीतून.

हया तिन्ही पातळ्यांचा विचार करीत असताना जाणवते ते हे की, अनंत कदम हयांच्या कादंबऱ्या आस्वादक, अवलोकन हयांच्यापेक्षा अनुभवलेपणाची जाणीव प्रकर्षाने देतात. 'कॅन्सर' (१९८१) ही कादंबरी वाचताना प्रेम, माणुसकी नष्ट झालेल्या समाजातील नायकाचे वेगळेपणाने वावरणे आपल्याला अस्वस्थ करते.

कादंबरीकार कोणत्याही कालखंडातील असो, कोणत्याही वाङ्:मयप्रकारात कलात्मक निर्मिती करणारा असो, त्याच्या कलात्मक निर्मितीमध्ये त्याच्या जीवनानुभवांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. त्याने जे भोगले, सोसले, अनुभवले व जे जे म्हणून पाहिले, तेच आणि त्याच्या आसपासच्या घडणाऱ्या घटनाप्रसंगांवरच तो लिहीत असतो. तसेच आजुबाजूचे वातावरण व त्याच्यावर घडणारे चांगले अथवा वाईट संस्कार हयातूनच त्याची लेखणी लक्षणीय ठरु लागते. अशा हया घटकांमधूनच त्याचे अनुभवविश्व आशयसंपन्न होत राहते. कादंबरीकार हा आपल्या कादंबरीतून जीवनदर्शन घडविताना आपल्या जीवनातील एखादादुसरा नाटयात्मक प्रसंग पकडून तो कादबरीत गुंफण्याचे धाडस करीत असतो. तेवढे सामर्थ्य त्याच्या जवळ असते. त्याचा जीवनाकडे पाहण्याचा जो काही दृष्टीकोन असतो, त्या अनुषंगाने तो तात्त्विक मूल्यांची जोपासना आपल्या कादंबरीतून करीत असतो. अशा व्यवहारातून त्याचे अनुभवविश्व साकारत जाते.

हया पार्श्वभूमीवर आता 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर' (१९८१) हया दोन कादंबऱ्यांमधील अनुभवविश्व आपण जाणून घेऊ.

## ३.२. अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील अनुभवविश्व :

अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) हया कादंबरीत नोकरी गेलेल्या एका तरुणाची एक दिवसाची कथा आलेली आहे. नोकरी करत असताना घरात मिळणारी वागणूक आणि नोकरी गेल्यानंतर मिळणारी वागणूक हयामुळे हया कादंबरीच्या नायकाचा भ्रमनिरास होतो. तो वैफल्यग्रस्त बनतो. परंतु हतबल किंवा निराशावादी बनत नाही. जेंव्हा तो मानवी जीवनाला अध्यात्माची पातळी लावून पाहतो, तेव्हा सर्वजण वळवळणारे

किडे आहेत, असा त्याला भास होतो. प्रचंड वाढलेल्या नागरजीवनात आपले अस्तित्त्व काय असणार, तर हे किडयांपेक्षा वेगळे नाही, एवढेच नव्हे, तर सगळीच माणसे किडयांसारखी आहेत, हे मांडण्याचा यशस्वी प्रयत्न अनंत कदमांनी 'किडे' हया कादंबरीतून केला आहे.

कादंबरीचा नायक हा वैफल्यग्रस्त झाला आहे. त्याचा पूर्णपणे अपेक्षाभंग झाला असल्याने तो जीवनाकडे एक वेगळ्याच दृष्टीकोनातून पाहतो. नोकरीला असताना घरातील सर्व माणसे त्याला खूप जपत तो घराचा मोठा आधार होता. तो कस्टम खात्यात प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर म्हणून काम करत होता. कामाला जाताना आई त्याला गरमागरम नाष्टा करुन देत होती. प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर असताना त्याने कोणत्याही प्रकारच्या अवैध मार्गाने संपत्ती जमा केली नाही. त्याचे सहकारी मात्र हयाबाबतीत आघाडीवर होते. त्याचे असे वागणे सहकाऱ्यांना एक दिवस अडचणीत आणणार, असे वाटून त्याचे सर्व सहकारी कटकारस्थान करुन त्यालाच लाच घेतल्याप्रकारणी अटक करण्यास लावतात. अटक झाल्यावर त्याला शिक्षा होते. त्यानंतर त्याचे जीवनच बदलून जाते. प्रत्येक प्रसंगाचा विचार तो आध्यात्मिक पातळीवरुन करु लागतो. अशा हया नायकाच्या माध्यमातून समाजाच्या एका वेगळ्याच स्वरुपात दर्शन कादंबरीतून अनंत कदम घडवून आणतात.

कादंबरीचा नायक सकाळी पाच वाजता उठून नळाखाली गार पाण्याने अंघोळ करुन मन:शांती मिळविण्यासाठी मंदिरात जात असे. परंतु नोकरी गेल्यानंतर आता तिथे त्याचे मन रमत नाही. तेथील प्रसन्नता त्याला खोटी वाटू लागते. म्हणून तो मंदिरात जाणे बंद करुन टाकतो व समुद्रकिनारी फेरफटका मारुन येण्याचा नित्यनियम सुरु करतो. तेवढेच त्याला तासभर बरे वाटू लागते. तेथून परत आल्यानंतर आपल्या मोडकळीस आलेल्या जीर्ण खुर्चीत बसून समोरच्या परिसराचे निरीक्षण करावयाचे, हा त्याचा

नित्यनियम होऊन जातो. आपले तोंड कोणाला दिसू नये, हयाची तो काळजी घेऊ लागतो. त्याचे पाय काटक्यांसारखे झाले आहेत. फाटका गंजीफ्रॉक दोन दिवस धुतलेला नाही. त्याच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. लक्ष देण्याची गरजही कोणाला वाटत नाही.

नोकरीस असताना घरातील माणसे फार काळजी घ्यायची, ते त्याला आठवते. गावकरी अदबीने बोलायचे. पण त्याला वाटायचे की, आपण ऑफिसर झालो म्हणजे काही वेगळे केले, असे नाही, आणि बेकार झालो, नोकरी गेली म्हणजे नालायक झालो, असेही नाही.

त्याला आठवते, एक दिवस कस्टममधील शिपाई गणू पवार भेटतो. तो आता 'जी.एस.पवार ॲक्मे प्लॅस्टिक वर्कस' चा मालक झालेला असतो. हे पाहून त्याला नवल वाटते, हा कस्टममधील नोकरीचा परिणाम, हे त्याच्या लक्षात येते. नायकाला लाच घेतल्याप्रकरणी पकडल्यानंतर कोणीच विचारीत नव्हते, कोणीच मायेने हाक मारीत नव्हते की कोणी मायेने खाऊ घालत नव्हते. तो घरातल्यांवर बोजा असल्यासारखे वाटू लागते. नोकरीसाठी तो बराच प्रयत्न करतो. परंतु नाव बदनाम झाल्याने त्याला नोकरी मिळत नाही. तो नोकरीची अपेक्षा सोडूनच देतो.

घडयाळ्यात सकाळचे आठ वाजले असताना तो संडासला जातो. परंतु संडाससमोर लाईन लागलेली असते. त्याचा नंबर अकरावा. पूर्वीचे दिवस त्याला आठवतात. तेंव्हा आपण पांढऱ्या शुभ्र लेंग्यात असायचो, माणसे अदबीने वागायची, परंतु तीच माणसे आता विचारतही नाहीत. आपल्याशी कोणी बोलतही नाही, हयाचे त्याला वाईट वाटते. समोरच्या खिडकीतील (व्यभिचारामुळे असाध्य रोग झालेली) सुंदराबाई पाहून त्याला वेश्या व्यवसायासंबंधी प्रश्न पडतो. शेवटी त्याचे डोके चक्रावून जाते. त्याला

सर्वजण घाणीतील किडयासारखी वाटू लागतात. जीवन एक गटार आहे. माणसे झुरळ, उंदीर आहेत, हयाचे त्याला वाईट वाटू लागते.

नोकरी गेल्याने आई, भाऊ, बहीण हे घरचे लोक नीट बोलत नाहीत. श्यामचे (धाकटे भाऊ) ते कौतुक करतात. कारण तो नोकरी करतो. म्हणून पैसा संपला की सारे संपते, असे त्याला वाटते. आपण घरासाठी इतके केले. पण आता जेवणार काय, म्हणूनसुध्दा कोणी विचारात नाही. त्यामुळे प्रत्येक माणूस हा किडा आहे, स्वार्थांचा किडा! दुसऱ्याला पोखरुन स्वत:स पोसणारा ! स्वत:भोवती घिरटणारा स्वार्थांच किडा आहे, असे त्याला वाटते.

शीला हया आपल्या मैत्रिणीसोबत मजेत घालवलेले दिवस त्याला आठवतात. पण तीही त्याला आता टाळू लागली आहे. समाजात अपप्रवृत्ती वाढत असून कुणी कुणाचे तरी खात आहे, कोण कोणला तरी खात आहे, कोण कोणाला तरी पिळून घेत आहे आणि आपले काम झाले की फेकून देत आहे, असे त्याला वाटते. सर्वजण स्वार्थाची गटार आहेत, असे त्याला वाटू लागते. तो निपचित तसाच पडून राहतो.

बापूराव हा त्याला लग्नाविषयी कायमच छेडत असतो. तो पक्का बहाणा करणारा नाटकी माणूस आहे, हे त्याने ओळखलेले असते. तो ऑफिसर होता, तेव्हा अनेक मुली चालून यायच्या. पण आता कोणीही येत नाही. त्याला लग्न म्हणजे एक सौदा वाटतो. कोणाला तरी गळयात बांधणे, दोन शरीरांना बांधणे, मुले प्रसवणे, एवढाच लग्नाचा अर्थ त्याला वाटतो. बापूरावाच्या असल्या चौकशीमुळे त्याला जीव दयावसा वाटतो. पण हा जीव पुन्हा मिळेल, हयाची काय खात्री, म्हणून तो सर्व काही सहन करतो.

कधी काळी कस्टमचा शिपाई असणारा गणू हा 'जी.एस.पवार' हया प्लॅस्टीक कंपनीचा मालक झाला. वर्तमानपत्रवाल्याशी वशिला लावून त्याने समाजकार्य

केले. त्यातून त्याने पद्मश्री मिळविली, हे ऐकून नायकाला वाईट वाटते. पण असल्या मार्गाने यश मिळविलेल्यांवर लोक थुंकतात. म्हणून असल्या मार्गाने मिळविलेले त्याला काहीच नको आहे.

रामा हा विसू देढेचा मावसभाऊ असतो. पण विसू देठेचे आणि रामाच्या बायकोचे अनैतिक संबंध होते. माणसाने भावाच्या बायकोशी संबंध ठेवावेत, वासनेने इतके पेटावे की त्याला भावाची बायको समजू नये, दिवस-रात्र समजू नये, हे पाहून नायकाला ही माणसे जनावरासारखी वाटतात. त्याचे घाणीने बरबटलेल्या डुक्करामध्ये रुपांतर झाल्यासारखे वाटू लागते. येथे समाजातील वासनांधांचे चित्रण प्रतिनिधिक रुपाने केले आहे.

दुपारी बारा वाजता बहीण त्याला जेवणासाठी बोलावते. नोकरी गेल्यापासून जेवणात फरक पडला आहे. असे जेवण तक्रार न करता त्याला जेवावे लागते. जेवण झाल्यावर आहे त्या खुर्चीत परत येऊन तो बसतो. येणाऱ्या जाणाऱ्याकडे तो पहात राहतो. समोरच्या बस स्टॉपकडे त्याचे लक्ष जाते. बस स्टॉपवरची माणसे एकाच तरुणीकडे पहात असतात. रांगेत म्हातारासुध्दा हया वयातही तिच्याचकडे पहात आहे, हे पाहून त्याला हसू येते. त्याचे लक्ष स्टॉपच्या पलिकडे जाते. तिथे काही भिकारी बसले आहेत, तरी त्यांची मुले विडया ओढू लागली आहेत, हयातून कादंबरीकाराने नायकाच्या माध्यमातून समाजाचे अनेक प्रश्न उभे केले आहेत.

नोकरी मिळत नाही म्हणून नायक त्रस्त झाला आहे. शेवटी तो मिलिटरीमध्ये जाण्याचा प्रयत्न करतो. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आणि स्वातंत्र्य वाचविण्यासाठी फक्त गरिबांनीच मरावे! श्रीमंतांनी फक्त आराम करावा, चैन करावी, असे वाटून तो मिलिटरीमध्ये जाण्याचा निर्णय बदलतो. जी युध्दे होतात, ती केवळ

स्वार्थीपणामुळे होतात. हा स्वार्थीपणा सोडला, तर युध्द करण्याची गरजच नाही, असे त्याला वाटते. युध्दामुळे गोळ्या घालून आपण शत्रू ठार करीत नाही, तर अनेक शत्रू जन्मास घालतो व हे कोणासच कसे कळत नाही, असा त्याला प्रश्न पडतो.

नायकाच्या घरी नीला नावाची एक मुलगी धुणी भांडी करण्यास यायची. तिचा वडील दारुडया असतो, तर आई नीलाच्या लहाणपणीच वारलेली असते. त्यामुळे घरीच जबाबदारी नीलावर पडते. ती नायकाला दादा म्हणायची पण एवढयाशा मुलीला जगाची काय कल्पना! तिचा उपभोग अनेकांनी घेतला. शेवटी गर्भवती नीलाने आत्महत्या केली. पण ज्यांनी तिचा उपभोग घेतला, त्यांचे काय आणि आपण भाऊ म्हणून काय केले. हा प्रश्न त्याच्यासमोर येतो. तो रागाने लालबुंद होतो. हया जनावरांची इंद्रियेच कापावीत, असा विचार त्याच्या मनात येतो. त्यामुळे सभोवतालचे जग म्हणजे मोठे गटारच असल्यासारखे त्याला वाटते. माणूस वासनेला जिंकू शकत नाही, हयाचे त्याला वाईट वाटते.

समोरच्या फूटपाथवर बसलेल्या भिकाऱ्यांकडे नायक पाहतो. त्यांचा इतिहास त्याला आठवतो. त्यांच्याकडे पाहताना त्याचे डोळे पाणवतात. त्यांना आपण कोणतीच मदत करु शकत नाही, हयाबद्दल तो एकदम स्वत:वर वैतागतो. आपल्या मरणाने जर त्यांची दोन वेळच्या जेवणाची सोय होणार असेल, तर आपण देहत्याग करण्यासाठीसुध्दा तयार असल्याचे तो स्वत:शीच म्हणतो.

क्षणभर नायक विचारातून मुक्त होतो आणि निळ्याभोर आकाशात त्याचे मन रमू लागते. घडयाळ्यात दुपारचे पाच वाजतात. तशी माणसांची रस्त्यावरची गर्दी वाढू लागते. नाना शेटे स्वत:ला श्रीमंत समजणारा, श्रीमंताचे प्रदर्शन करणारा माणूस आहे. इंग्रजी बोलण्याची हौस असलेल्या नाना शेटेने आपल्या मुलीला कस्टममधील

आलेल्या कॉलसाठी नायकाकडून पैसे देऊन पेपर काढण्यासाठी सांगतो. बस स्टॉपवरील गर्दी वाढतेय. प्रत्येक माणूस काहीतरी गाठण्याची धडपड करतो आहे. प्रत्येकजण स्वार्थाने पेटला आहे. एकमेकाच्या पुढे जाताना तुडवण्याची तयारी ठेवली आहे. नायकाला ही गटार वाटते. त्यातील किडे आहेत, असे वाटू लागते.

संध्याकाळचे सात वाजतात. कंटाळा आला म्हणून नायक फिरण्यास जातो. घरी जाण्यास रात्रीचे साडेनऊ वाजतात, म्हणून तो घाबरतो व धावतच घरी येतो, तर घरातील सर्वजण झोपलेले असतात. दार ठोठवण्याची त्याची छाती होत नाही. नको ते ऐकावे लागेल, म्हणून तो नळाचे पाणी पितो आणि झोपी जातो. नायकाला असे वाटू लागते की, कोणी कोणाचे असते ते एका मर्यादेपर्यंत आणि कोणी कोणाचे असण्यात फक्त स्वार्थ असतो ! सर्वजण स्वार्थांचे किडे आहेत. नुसती गटार !

प्रत्येकाचा स्वार्थीपणा नायकाला जाणवू लागतो. अंथरुणावर त्याला आपले बालपण आठवू लागते. आनंदी आनंद असणारे. गावाकडील शेतीवाडी असणारे बालपण आठवतच त्याला झोप लागते. इतक्यात दंगा उठतो. सर्व चाळ जागी होते. घरातलेही उठतात, तोही उठतो. वासू देठे रामाच्या बायकोबरोबर असलेल्या अनैतिक संबंधाबद्दल मार खात असतो. घरातील माणसे बाहेर आलेली पण त्याला कोणी जेवलास काय, म्हणून सुद्धा विचारीत नाहीत. सर्वजण झोपी जातात व तो पुन्हा एकटाच उरतो. त्याच्या मनात प्रश्नांचे काहूर उठते. वाईटाचा, पापाचा विचार सुरुच आहे आणि विचार म्हणजे कृतीच आहे. माणूस इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे, हे संगळ्याना सांगावेसे वाटते. पण तो वेगळ्याच विचारात गढून जातो. त्याला भयंकर खिन्नता वाटू लागते. जो तो ‘मी’ मध्ये गुरफटलेला आहे, हया विचाराने खिन्न झाल्यामुळे नायकाला काय करावे, कुठे जावे, हे समजत नाही. पण तो निश्चयाने उठतो आणि आत्मविश्वासाने बाहेर पडतो.

सर्व चाळ गाढ झोपेत असताना मात्र गटाराचे पाणी अधिकच विळख्या देत आहे, हे त्याला जाणवते. तो तसाच घरातुन बाहेर पडतो.

'किडे'(१९७१) हया कादंबरीमध्ये कादंबरीकाराने प्रथमपुरुषी निवेदनशैली वापरली आहे. त्यातून एका सुशिक्षित तरुणास नोकरी गेल्यानंतर कोणकोणत्या परिस्थितीला तोंड दयावे लागते, त्याची मानसिकता कशी झाली आहे, नोकरी गेल्यामुळे समाजाचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन कशा पध्दतीचा झाला आहे हयाचे वृदयद्रावक चित्रण करण्यात अनंत कदम यशस्वी झाले आहेत.

**३.३. अनंत कदम हयांच्या 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीतील अनुभवविश्व :**

'कॅन्सर'(१९८२) ही कादंबरी अनंत कदमांनी स्वतःच्या जीवनातील अनुभवावर आधारीत लिहिली आहे. कादंबरीचा नायक हृदयनाथ पांडुरंग भोसले हा परिस्थितीशी झगडत एम्.ए. पर्यंत शिकला आहे. वडील सरकारी दवाखान्यात कंपाऊंडर आहेत. आई घरकाम करते. चंदू नावाचा लहान भाऊ व नीला आणि नयना हया दोन बहिणी आहेत. कादंबरीचा नायक हृदयनाथ हयाच्यावर घरची बरीच जबाबदारी आहे. तो सर्वांत मोठा मुलगा आहे. हे कोकणी मराठा कुटुंब आहे. वडिलांच्या जेमतेम पगारावर कसातरी संसाराचा गाडा चालत असतो.

हृदयनाथ पांडुरंग भोसले हा नोकरी करतच शिक्षण घेतो. तो एम्.ए. इंग्रजीमधून झाला आहे. सरळमार्गी जगणाऱ्या हृदयनाथास 'पैसा नसला की माणसाची समाजात व घरात किंमत एकदम डाऊन होते,' हे माहीत आहे. म्हणून नोकरीसाठी त्याची धडपड सुरु आहे.

BARR. B... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

हृदयनाथाचा मित्र मानकामे हा कॉलेजमध्ये असलेल्या प्राध्यापक पदाच्या रिकाम्या जागेबाबत त्याला सांगतो. कॉलेजला आवश्यकता असल्याने लगेचच हृदयनाथाला नेमणुकीच पत्र मिळाते. तो आनंदाने शिकविण्याचे काम करु लागतो. एक इंग्रजी प्रेमविषय कविता (सॉनेट) शिकवीत असताना एका मुलीशी त्याची नजरानजर होते. त्यांच्या भेटीगाठी वाढत जातात. त्यातून प्रेम निर्माण होते. ती मुलगी इराणी मुस्लीम असून तिचे नाव 'शबाना' असते. हृदयनाथ भोसले हा मराठा असतो. धर्म वेगळा, जात वेगळी, तरीही त्यांचे एकमेकावर जिवापाड प्रेम असते. पण हृदयनाथाचे आईवडील त्याच्यासाठी मुलगी बघू लागतात. पैसा, इस्टेट, ब्लॉक मिळविणे, हया त्यांच्या अपेक्षा असतात. पण हृदयनाथास हया अपेक्षा म्हणजे सौदा वाटतो. हृदयनाथ हा शबाना ह्या मुस्लीम मुलीशी पळून जाऊन लग्न करतो. समाजाला हे पटत नाही त्याला नोकरीतून कमी केले जाते. येथूनच त्याच्या जीवनाची फरफट सुरु होते.

आंतरधर्मीय विवाह केल्याने हृदयनाथ व शबाना हयांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलतो. मित्र टाळू लागतात. नोकरी नाही, जवळ पैसे नाहीत. खंडेरावाच्या मदतीने एका खेडेगावात त्याला मुख्याध्यापकाची महिना तिनशे रुपये पगारावर नोकरी मिळते. दोन-तीन महिने बरे जातात. पण नंतर पगार मिळेनासा होतो. गावातील संबंध चांगले असतात पण मोहिते नावाच्या बौद्धवाडयात राहणाऱ्या विद्यार्थ्याकडे चहा घेण्याचे निमित्त होते आणि गावकऱ्यांमध्ये असंतोष पसरतो. ही गोष्ट चेअरमनपर्यंत पोहोचते आणि हृदयनाथाला नोकरीला मुकावे लागते. त्याला दोन महिन्यांचा पगारसुध्दा मिळत नाही. नोकरी सुटलेली, गाव सुटलेले, पैसा नाही आणि शबाना गरोदर अशा अवस्थेत ते गाव सोडून हृदयनाथ व शबाना दोघेही नंदनपूरला कसेबसे येऊन पोहोचतात. लागलीच शबानाला सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात

येते. त्यांना जुळी मुले होतात. दोन महिन्यांनी त्यांची नावे 'निकिता' आणि 'निक्सन' अशी ठेवण्यात येतात. एक रशियाचे टोक आणि दुसरे अमेरिकेचे टोक. दोन्ही एकमेकांविरुध्दची राष्ट्रे, पण ही एका घरात नांदावीत, ही अपेक्षा ठेवून शांतीचा प्रसार करणारी नावे मुलांना ठेवण्यात आलेली असतात.

मानकामेचा मित्र पांडुरंग लांडे हा गरिबीचा, प्रमाणिकपणाचा,भोळेपणाचा आव आणणारा, दारु मटण हयांची हाव असणारा, खोटे बोलून पैसे उकळणारा असा असतो. मे महिन्यात नंदनपूर विदयापीठातून ह्रदयनाथाला पत्र येते. चारशे पदवीधरांमधून त्याची 'कारकून' पदासाठी निवड करण्यात आलेली असते. तो तेथे हजर होताच ब्राम्हण-मराठा संघर्षामध्ये त्याचाही समावेश करण्यात येतो. विद्यापीठातील हेवेदावे, राजकारण, जास्तीचे काम आणि वरिष्ठांची टोचणी हयामुळे ह्रदयनाथाला नोकरीचा वैताग येतो. ब्राम्हण-मराठा वादामुळे ह्रदयनाथावर जास्त बोजा पडतो. एक मराठा माणूस कमी व्हावा, म्हणून ह्रदयनाथाला पळवून लावणचा कट करण्यात येतो. विदयापीठात परीक्षेपासून सर्वत्र भ्रष्टाचाराला ऊत आलेला असतो. भ्रष्टाचाराचे समर्थन केले, तरच नोकरी टिकण्याची शक्यता, अशी परिस्थिती निर्माण झालेली असते. ह्रदयनाथाला नोकरीच्या ठिकाणचा आणि घराचा असा दोन्हीकडील प्रश्न मिटविण्यासाठी झुंजावे लागते. राहत्या घराची समस्यातर होतीच, शिवाय मुलांच्या शाळेच्चीही समस्या जाणवू लागते. राहते घर ह्रदयनाथाला बदलावे लागायचे. कारण घरमालक जास्त दिवस ठेवून घ्यायचे नाहीत. त्यामुळे लमाणासारखे डोक्यावर बोजा घेऊन फिरावे लागे. कामाच्या ठिकाणीही वाद वाढत असत. वरिष्ठांबरोबर मतभेद होत. रजा मागितली की, सहा महिन्यांची घ्या, असा सल्ला मिळायचा.

नीला आणि नयना हया ह्रदयनाथाच्या दोघी बहिणींची लग्न अचानक जमतात. तसे त्याला घरचे लोक पत्राने कळवतात. खरे तर ह्रदयनाथाच्या आंतरधर्मीय विवाहामुळे त्याच्या हया बहिणीची लग्ने सहा-सात वर्षे पुढे गेलेली असतात. बहिणींच्या लग्नाला जावयाचे म्हणजे काहीतरी घेऊन गेले पाहिजे, असे त्याला वाटते, साधे मंगळसूत्रही नसते. कर्ज काढून ते घ्यायचे, असे तो शबानाला सुचवितो. पण शबानाला तो विचार पटत नाही. हया सर्व धावपळीत ह्रदयनाथाला आपल्या तब्बेतीकडे लक्ष देणे शक्य होत नाही. तो खंगून जातो. नोकरीच्या ठिकाणची वरिष्ठांची अरेरावीची भाषा आणि घरातील समस्या हयामुळे ह्रदयनाथ हैराण होतो.

प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार सुरु आहे. कष्ट, प्रमाणिकपणा, सदाचार हया गोष्टींचा लोकांना विसर पडत चालला आहे. सर्व वातावरण अस्वस्थ करणारे आहे. ह्रदयनाथ हया सर्व विचाराने अस्वस्थ होतो. शेवटी ह्रदयनाथाविरुध्दच सी.आय.डी. ऑफिसमध्ये पैसे घेऊन पास केल्याची तक्रार दाखल होते. हलकट, कारस्थानी माणसांनी जग भरलेले आहे, हे लक्षात येऊन ह्रदयनाथाचे मन रागावते. सरळमार्गी निर्मळजीवन हया लोकांनी अशक्य करुन टाकले आहे, हे जाणवून त्याचा जीव गुदमरु लागतो. वडिलांना लघवीचा त्रास जाणवू लागतो. घरखर्च आणि वडिलांच्या औषधांचा खर्च ह्रदयनाथ ओव्हर टाईम करुन भागवत असतो. दोन-तीन महिन्यांनी परत त्याला कळा मारु लागतात. ह्रदयनाथाच्या ओव्हर टाईमचा त्याच्या शरीरावर परिणाम होऊ लागतो. लघवीच्या त्रासामुळे वडिलाचे निधन होते. धाकटा भाऊ चंदूच संपूर्ण उत्तरकार्य करतो. ह्रदयनाथाला वडिलांची उणीव जाणवू लागते. ओव्हरटाईमच्या त्रासामुळे ह्रदयनाथाची तब्येत पूर्ण कोसळून जाते. औषधे घेतली की तेवढयापुरताच फरक पडे. शेजाऱ्याकडूनही त्रास होई ते मुलांना एकत्र खेळण्यासही घेईनात हया सर्व गोष्टींचा ह्रदयनाथाला कंटाळा

येतो. विदयापीठामध्ये त्रास वाढत असतो. हृदयनाथावर पुराव्यानिशी व साक्षीदार हयावरुन सिद्ध होणारे आरोप झाल्यामुळे तो विद्यापीठातील नोकरीचा राजीनामा देतो. अर्थात तो हयामुळे हतबल होत नाही. 'जनसत्ता' हया दैनिकात तो काम सुरु करतो.

तब्बेत खालावतच असते. म्हणून तो डॉक्टरकडे जाऊन येतो. सर्व रिपोर्टवरुन डॉक्टर हृदयनाथला ब्लड कॅन्सर असल्याचे सांगतात. हे ऐकून त्याला धक्काच बसतो. शबानाही हादरुन जाते. तिचा हया गोष्टीवर विश्वासच बसत नाही. हृदयनाथाला पूर्वीचे दिवस आठवतात, आपण किती कष्ट सोसले, किती जणांनी आपल्याला त्रास दिला, पण आपण जिद्दीने सर्वांशी सामना केला. हृदयनाथ शबानाला धीर देऊन दवाखान्यात ॲडमीट होण्यासाठी जातो. सर्व डॉक्टर्स हृदयनाथाचीच वाट पहात असतात. डॉक्टर सांगतात, "अगोदरचा रिपोर्ट आपल्याला सांगितला, तो चुकीचा आहे. आपण आम्हाला माफ करावे" हे ऐकून हृदयनाथ आनंदाने नाचू लागतो पळतच तो घरी जातो. ही बातमी शबानाला कधी सांगेन, असे त्याल होते. घरी येतो. अनाकलनीय असे काही तरी त्याला वाटू लागते. शबानाच हया जगातून निघून गेलेली आहे हे त्याला कळते. त्याच्याशिवाय जगणे त्याला असहय होते. त्याला एकदम पोकळी जाणवू लागते. प्रसन्न हसरा चेहरा दृष्टिआड होणार, हया विचारानं तो व्याकुळ होतो.

अशा प्रकारे अनंत कदम हयांनी 'कॅन्सर'(१९८२) हया कादंबरीमध्ये हृदयनाथ पांडुरंग भोसले हया तरुणाची कहाणी रेखाटली आहे. शहरामध्ये वाढत जाणारी स्पर्धा, वाढती बेकारी, राहण्याचा प्रश्न, जीवनमूल्यांचा होत असलेला ऱ्हास, नैतिकतेची होत असलेली पायमल्ली, शहराची गतिमानता, औद्योगिकरण, शहराकडे येणारे लोंढे, त्यातून सुरु होणारे अवैध धंदे, हया सर्वांत सापडलेला आजचा तरुण व त्याच्या अपेक्षा

15382

हया सर्वांचे चित्रण 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमध्ये अनंत कदम हयांनी उत्कृष्टपणे केले आहे.

हृदयनाथावर इतकी संकटे आली, इतक्या अडचणी आल्या, परंतु त्याने कधीही संकटासमोर हात टेकले नाहीत किंवा हार मानली नाही. आलेल्या संकटांना त्याने धैर्याने तोंड दिले. नोकरीच्या ठिकाणचा वाढता भ्रष्टाचार तो पहात होता. हया भ्रष्टाचाराला विरोध करणे त्याला जमत नव्हते, तरी तो त्यात सामीलही होत नाही. सरळमार्गी असलेल्या हृदयनाथाला बायकोसुध्दा त्याच विचाराची मिळाली वडीलसुध्दा त्याला मरेपर्यंत मदत करत राहीले. आई मात्र जुन्या विचारांची असल्याने व मुला मुलींच्या भवितव्याची तिला काळजी असल्याने ती हृदयनाथास घरातून बाहेर काढते. कारण ह्दयनाथाने शबानाबरोबर आंतरधर्मीयविवाह केलेला असतो. तरी सुध्दा ह्दयनाथ आणि शबाना हे दोघे सर्व संकटांना, अडीअडीचणींना धैर्याने तोंड देतात. थोडक्यात, सरळमार्गी माणसाला किती अडचणी, संकटे येतात, हयाचे चित्रण कादंबरीकाराने येथे प्रभावीपणे केलेले आहे.

## ३.४ समारोप :

हया तिसऱ्या प्रकरणात आपण अनंत कदत हयांच्या 'किडे' (१९७१) व 'कॅन्सर'(१९८२) हया दोन कादंबऱ्यामधील अनुभवविश्वासाचा अभ्यास केला. हयामधील 'किडे' हया कादंबरीचा नायक हा कस्टममध्ये नोकरी करताना लाच घेण्यास नकार देतो. म्हणून सहकारी त्याला पकडून देतात. त्यानंतर निराश झालेला हा तरुण घरी बसूनच असतो. त्याची एक दिवसाची त्याची कार्यपद्धती कादंबरीकाराने मांडली आहे. एका विशिष्ट पातळीवरुन सर्व गोष्टींचे निरीक्षण करताना हया नायकाला सर्वजण, सर्वजग हे किडयाप्रमाणे वाटू लागते. जग म्हणजे एक मोठी गटार असल्यासारखे त्याला वाटू लागते. पैसा, नोकरी हे नसले की, माणसाची किंमत एकदम कमी होते, हयाचा तो अनुभव घेतो. भ्रष्टाचार, अनैतिकता, व्यभिचार, लुबाडणूक इ. प्रश्नांचा कदम हयांनी 'किडे' (१९७१) हया कादंबरीत योग्य पध्दतीने मागोवा घेतला आहे.

'कॅन्सर' (१९८२) हया दुसऱ्या कादंबरीमध्ये आंतरधर्मीयविवाह कलेल्या ह्रदयनाथास समाज कशा पध्दतीने छळतो, हे मांडण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे. आंतरधर्मीय विवाहाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन, सरकारी कामामध्ये चालणारा भ्रष्टाचार, विदयापीठातील चालणारा अनागोंदी कारभार, राहण्याचा प्रश्न, फसवणूक, चाळीतील जीवन, झोपडपट्टीतील जीवन, व्यभिचार हया सर्वांची मांडणी कादंबरीकार अनंत कदम हयांनी यशस्वीपणे केलेले आहे.

आंतरधर्मीय विवाहामुळे समाजात काहीच किंमत राहत नाही. नोकरी आणि पैसा नसला की माणसाला कोणीही किंमत देत नाही, हे सत्य त्यांनी 'किडे' हयाचप्रमाणे 'कॅन्सर' मध्येही मांडले आहे. 'कॅन्सर' मधील नायक कितीही संकटे

आली, तरी आपल्या मुल्यांपासून विचलित होत नाही. पारंपरीक मूल्यांना चिकटून राहिलेल्या समाजाविरुध्द मनात अतोनात असणारी चीड 'कॅन्सर' मधून व्यक्त झाली आहे.

अनंत कदम हयांच्या 'किडे'(१९७१) व 'कॅन्सर'(१९८२) हया दोन महानगरीय जीवनावर आधारित कादंबऱ्या आहेत. हया कादंबऱ्यांमधून त्यांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेला विरोध दर्शविला आहे.